## नि.दि.दा.क्र.२७५/२०१७ मधील निशाणी २८ वरील आदेश

सदरहू अर्ज वादीनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जास पुरक शपथपत्र देण्यात आलेले आहे. त्यावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी अर्जातील कथनांप्रमाणे युक्तीवाद केला. थोडक्यात, त्यांनी असा युक्तीवाद केला की, दाव्यामध्ये नजरचुकीने दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे नमुद केले आहे. तसेच, दावा मिळकतीमध्ये वादीचा १/४ हिस्सा असल्याचे समाविष्ट करणे राहून गेले होते. सदर प्रस्तावित दुरूस्ती दाव्याचे कामी समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने दाव्यात दुरूस्ती केल्यास दाव्याचे स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. तसेच, प्रतिवादीस कोणताही पूर्वाग्रह होणार नाही. सबब, सदर अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. प्रतिवादीचे विद्वान विधिज्ञांनी त्यांचे म्हणणे मधील कथनांप्रमाणे युक्तीवाद केला. थोडक्यात, त्यांनी असा युक्तीवाद केला की, सदर अर्ज दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने दाखल केला आहे. अर्ज कायदेशीर नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा. विकल्पेकरून, प्रस्तुत अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास ज्यादा खर्चावर मंजुर करावा.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा वाटप, जाहीर ठरावाकरीता व निरंतरच्या ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादींनी दावा मिळकतीचे क्षेत्र व त्यांचा १/४ हिस्सा याबाबत दुरूस्ती करण्याची विनंती केल्याचे दिसून येते. दाव्यात सुनावणी सुरू झाली असली तरी वादीचा पुरावा सुरू असल्याचे दिसून येते. उभयपक्षांमधील मुख्य वादप्रश्न निकाली काढण्याकरीता प्रस्तावित दुरूस्ती आवश्यक असल्याचे दिसून येते. सदर दुरूस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींना कोणताही पूर्वाग्रह होणार नाही. अर्जात नमुद केलेले स्पष्टीकरण विचारात घेणे गरजेचे ठरते. त्यामुळे, अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याचे निष्कर्षास मी येत आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### – : आ दे श :–

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी २८) वादीने प्रतिवादींना खर्च म्हणून रक्कम रूपये ५००/– पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्याव्यात व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2025.11.07 15:14:57 +0530

(प्र.शं.गिरगांवकर)

दिनांकः ०७/११/२०२५ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, राहाता